**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः01.12.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४७ व्यां तुकडीचं दिमाखदार दीक्षान्त संचलन.
2. राज्यात येत्या 5 डिसेंबरला सरकार स्थापन होणार.
3. राष्ट्रीय सुरक्षिततेच्या मुद्यांवर सर्वोच्च पोलिस अधिकारी आणि सुरक्षितता संस्थाप्रमुखांसोबत पंतप्रधानांची चर्चा.
4. साप चावण्याच्या सर्व घटनांची नोंद करण्याची केंद्राची सर्व राज्यांना सूचना.
5. पुणे मॅराथनमध्ये १२ हजाराहून अधिक धावपटूंचा सहभाग.

आणि

6. बॅडमिंटनमध्ये भारताच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी.

**एनडीए**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४७ व्यां तुकडीचा दीक्षान्त संचलन सोहळा काल पुण्यात वायुदल प्रमुख एयर चिफ मार्शल अमर प्रीत सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत खेत्रपाल मैदानावर दिमाखात पार पडला. सैन्य दलाच्या कारकीर्दीत कठीण निर्णय घेण्याची वेळ तुमच्यावर येईल त्यावेळी तुम्ही तुमच्या विचारांशी एकनिष्ठ राहा म्हणजे सोप्या मार्गाचा अवलंब न करता आव्हानात्मक मार्गाचा स्वीकार कराल असा कानमंत्र त्यांनी छात्रांना याप्रसंगी दिला. एयर चिफ मार्शल अमरप्रित सिंग यांनी संचलनाचं निरीक्षण केलं. सिंग यांच्या हस्ते राष्ट्रपती सुवर्ण पदक अंकित चौधरी, रौप्य पदक युवराजसिंग चौहान, कास्य पदक जोधा थोंगजय मयो तर गोल्फ स्क्वाड्रनला चीफ ऑफ बॅनर प्रदान करून गौरवण्यात आलं. सुखोई विमानांनी याप्रसंगी आकाशातून भरारी घेतली. १४७ व्या तुकडीतील ३५७ छात्र सैन्य दलात दाखल झाले. यामध्ये १९ मित्र देशांच्या छात्रांचा समावेश होता.

**भुवनेश्वर-पोलिस परिषद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उच्च पोलीस अधिकारी आणि विविध सुरक्षा संस्थांच्या प्रमुखांशी राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विविध मुद्द्यांवर काल ओडिशात भुवनेश्वर इथं चर्चा केली. अखिल भारतीय महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेत पंतप्रधानांनी पोलिसांना भेडसावणाऱ्या विविध कार्यान्वयन आणि पायाभूत सुविधांशी संबंधित समस्यांवरही चर्चा केली. नवे फौजदारी कायदे, दहशतवाद आणि नक्षलवादाला प्रतिबंध, किनारी सुरक्षितता, अमली पदार्थांची तस्करी, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोनसारख्या तंत्रज्ञानामुळं निर्माण होणारी आव्हानं यासह राष्ट्रीय सुरक्षिततेसंदर्भात महत्वपूर्ण बाबींवर या परिषदेत चर्चा होत आहे. 2 हजार 47 पर्यंत भारताला पूर्ण विकसित राष्ट्र आणि 2 हजार 27 पर्यंत देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थ व्यवस्था बनवण्याचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सुरक्षितता यंत्रणांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे असं मत अमित शाह यांनी या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना व्यक्त केलं. पोलिस सेवेतल्या उल्लेखनीय सेवेसाठीची राष्ट्रीय पदकंही या परिषदेत प्रदान केली जाणार आहेत.

**साप**

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना राज्य सार्वजनिक आरोग्य कायदा किंवा इतर लागू कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार सर्पदंशाची प्रकरणं आणि त्यामुळं होणारे मृत्यू 'सूचित करण्यायोग्य रोग' म्हणून

गणण्यास सांगितलं आहे. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रधान सचिव आणि अतिरिक्त मुख्य आरोग्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलिला श्रीवास्तव यांनी सर्पदंश ही सार्वजनिक आरोग्याची महत्त्वपूर्ण चिंता असल्याचं सांगितलं. सूचित करण्यायोग्य रोग म्हणजे एक आजार, ज्याचं निदान झाल्यावर सार्वजनिक आरोग्य अधिकाऱ्यांना कळवणं आवश्यक असतं. साप चावण्याच्या समस्येवर उपाय म्हणून केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सर्व संबंधितांशी चर्चा करुन 2030 पर्यंत एक आराखडा तयार केला आहे. देशभरात साप चावण्याच्या घटना आणि त्यामुळं होणारे मृत्यु यांची नोंद ठेवणं या आराखड्यासाठी अतिशय महत्वाचं आहे.

**शपथविधी**

महायुतीमध्ये कसलाही वाद नाही असं सांगत राज्यात येत्या गुरुवारी 5 डिसेंबर ला शपथविधी होऊन सरकार स्थापन होईल असं उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवार यांनी म्हटलं आहे. राज्यात भाजपचा मुख्यमंत्री आणि शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उपमुख्यमंत्री बनतील असं त्यांनी काल स्पष्ट केलं. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत ५ डिसेंबरला मुंबईतल्या आझाद मैदानावर महायुती सरकारचा शपथविधी होणार अशी माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी समाजमाध्यमावरून दिली आहे.

**जैन संघटनाअधिवेशन**

भारतीय जैन संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनाचं उद्घाटन काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुण्यातील बिबवेवाड़ी इथं झालं. भगवान महावीर आणि जैन धर्मातील अन्य तीर्थंकरानी सांगितल्याप्रमाणे आपण घेण्यापेक्षा देण्यावर जास्त भर द्यायला हवा असं प्रतिपादन त्यांनी केलं. जैन समाजातील व्यक्ति कमाईपेक्षा जास्त समाजाला देण्यावर विश्वास ठेवतात. समाजातल्या प्रत्येक व्यक्तीची उन्नती करण्याचं ध्येय समोर ठेवून येणाऱ्या पिढ्यांना घडवण्याचं काम भारतीय जैन संघटना करत आहे त्यामुळे हा केवळ एका समाजाचा कार्यक्रम नसून हा भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादन विषयक कार्यक्रम आहे असं फडणवीस यांनी सांगितलं. यावेळी भारतीय जैन संघटनेचे शांतिलालजी मुथा, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

***हे प्रादेशिक बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.***

**सायबर गुन्हेगार**

**V/C**

सायबर गुन्हेगार डिजिटल अटकेचा बनाव करुन देशभरातील नागरिकांची कष्टाची कोट्यवधींची कमाई लुबाडत असल्याबाबत पंतप्रधानांनी ऑक्टोबरमधील मन की बात मध्ये सजगतेसाठी आवाहन केल्यानंतर लोक अधिकाधिक संख्येनं या बनावट गुन्ह्याबाबत जागरुक होताना दिसत आहेत. डिटिजल अटक अशी कोणतीही तरतूद कोणत्याही कायद्यात नाही. सायबर गुन्ह्यांबाबत सातत्यानं परस्पर माहितीची देवाणघेवाण आणि आपल्या ऑनलाईन आर्थिक व्यवहारांबाबत सतत दक्ष राहणे हाच यावर उपाय आहे.

*सायबर गुन्ह्यांबाबत माहिती असणारे लोक देखील गुन्हेगारांच्या धमक्यांना, तोतयेगिरीला, संभाषण चातुर्याला बळी पडत असल्याच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी मन की बात मध्ये स्व-संरक्षणाची त्रिसूत्री सांगितली होती. सायबर चोरट्याने कॉल केल्यानंतर सर्वप्रथम थांबा. शांत राहा आणि लगेच वैयक्तिक माहिती देऊ नका, घाबरु नका. विचार करा. कायदेशीर संस्था किंवा अधिकारी फोन कॉलवर कोणतीही वैयक्तिक चौकशी करत नाहीत किंवा पैशांची मागणी करत नाहीत हे लक्षात ठेवा आणि तिसरं म्हणजे कृती करा. अशा कॉल्सची तक्रार सायबर गुन्हे हेल्पलाईन क्रमांक १९३० किंवा सायबरक्राईम डॉट जीओवी डॉट इनवर करा. आपल्या कुटुंबियांना कळवा आणि पुराव्यांची नोंद करा. सायबर गुन्हेगार वैयक्तिक माहिती गोळा करुन कॉलद्वारे संपर्क केल्यानंतर पोलिस, सीबीआय किंवा इतर संस्थांचे*

*अधिकारी असल्याची थाप मारतात, बनावट गणवेश परिधान करतात आणि खात्री वाटावी अशी पार्श्वभूमी तयार करतात. विचार करायला सवड न देता ताबडतोब कृती करण्यासाठी दबाव टाकतात, अटक टाळण्यासाठी पैसे अन्य खात्यांमध्ये स्थानांतरित करण्यास किंवा केस बंद करण्याच्या बदल्यात पैसे मागतात. नागरिकांनी यापैकी कोणत्याही कृतीला बळी न पडण्यासाठी, योग्य माहितीचं शस्त्र त्यांच्याच हातात आहे.*

*आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.*

**धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे**

धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाचं 25 टक्के काम पूर्ण होण्याच्या मार्गावर असून एकंदर लहान-मोठे असे 50 पूल या मार्गावर असणार आहेत. त्यापैकी सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर 106 मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल साकारला जाणार आहे अशी माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली. सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या 84 किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाचं काम तीन टप्प्यात करण्यात येणार आहे. धाराशिव-तुळजापूर या 30 किलोमीटर रेल्वेमार्गावर तीन नवीन रेल्वेस्थानकं उभारली जाणार आहेत. धाराशिव मुख्य रेल्वेस्थानकाच्या पुनर्विकासासाठी केंद्रानं 21 कोटी रुपयांचा निधी दिला आहे.

**पुणेमॅरेथॉन**

३८व्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनला आज पहाटे ३ वाजल्यापासून सुरुवात झाली. सणस मैदानातून या स्पर्धेचा प्रारंभ झाला. सकाळी साडे आठ  वाजता स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ सणस मैदानात होणार आहे. “शाश्वत पर्यावरणासाठी धावा, हे यंदाचं घोषवाक्य आहे. या स्पर्धेमध्ये १२ हजारहून अधिक धावपटू धावत असून त्यात सुमारे ८० परदेशी स्पर्धक आहेत.

**बॅडमिंटन**

सय्यद मोदी भारतीय आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत, भारताच्या लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत सेननं जपानच्या शोगो ओगावाचा २१-८, २१-१४ असा पराभव केला. अंतिम सामन्यात लक्ष सेनची लढत सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेहशी होईल. दरम्यान भारताच्या पी व्ही सिंधूनंही महिला एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तिनं भारताच्याच उन्नती हुडाचा २१-१२, २१-९ असा पराभव केला. अन्य एका स्पर्धेत, ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद पुलेला या भारतीय जोडीनंही महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यांनी थायलंडच्या बेन्यापा एम्सार्ड आणि नंटकर्ण एम्सार्ड यांचा 18-21, 21-18, 21-10 असा पराभव केला. तर मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या भारतीय जोडीनं चीनच्या झाऊ झी हाँग आणि योंग जी यी या जोडीवर २१-१६, २१-१५ असा विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

**हवामान**

राज्यातल्या बहुतांश भागात थंडीचा कडाका वाढला आहे. काल राज्यात सर्वात कमी तापमान नाशिक इथं ८ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. आज कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहण्याची शक्यता असून विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.